भारतीय जनता पक्ष
केंद्रिय कार्यालय
11,अशोक रोड, नवी दिल्ली-110001
फोन नः23005700, फॅक्स- 23005787

दि. 30 जानेवारी,2014

भाजपा प्रवक्ते आणि खासदार श्री प्रकाश जावडेकर यांच्या द्वारे प्रसिद्ध केलेले प्रेस वक्तव्य

1.भारतीय रिझर्व्ह बँक द्वारे अचानक बँक दर 0.25 आधार अंक वाढविण्यात आल्याच्या निर्णयाने किंमती कमी होणार नाहीत, परंतु त्यांचे हे पाऊल प्रतिकूल साबित होईल आणि त्यांच्या या निर्णयामुळे इंधनाच्यौ किंमती वाढतील. युपिए सरकार कोणत्याही ठोस परिणामाशिवाय बँक दर, सीआरआर रेपो दर आणि रिव्हर्स रेपो रेट ला अनेक पटीने वाढविले. महागाईवर नियंत्रण आणण्यासाठी सरकारची रणनीति फक्त इथपर्यंतच सिमित राहिली आहे आणि व्याज दर वाढविण्यासाठी मागणीवर वाईट परिणाम झाला आहे.

जेव्हा एनडीए ने सत्ता सोडली होती त्यावेळी बँक दर आणि रेपो रेट 6 टक्के होता ज्याला युपिए सरकारने वाढवून 9 टक्के केला. मोठ्या व्याज दरामुळे निर्यात उद्योगाला नुकसान पोहोचले आहे आणि मध्यम वर्गाला अधिक ईएमआय द्यावा लागत आहे. अधिक खर्चामुळे अर्थव्यवस्थेचे सर्व क्षेत्र वाईट प्रकारे प्रभावित झाले आहेत.

युपिए सरकार आपूर्तिशी संबंधित मुद्द्यांचा कधीच समाधान करु नाही शकली, ज्याच्यामुळे ती महागाईवर नियंत्रण मिळविण्यात विफल ठरली. असे अर्थव्यवस्थेत नवा प्राण टाकण्यास मनमोहन सिंह आणि चिदंबरम यांच्याजवळील युक्त्यांच्या दिवाळखोरीमुळे असे झाले.

2. कॉग्रेस सरकाराला पाहिजे की, लोकांनी त्यांच्या या घोषणेमुळे खुश होऊन जावे, की प्रत्येक वर्षी प्रती कुटुंबाला एलपीजी सिलेंडरमध्ये दिली जाणारी सबसिडीची मर्यादा 9 सिलेंडर पेक्षा अधिक वाढवून 12 करण्यात आली आहे. देशाची जनता आता कॉग्रेसची स्तुती करण्याच्या मूड मध्ये नाही आहे. तर ती एक साधा प्रश्न विचारु इच्छिते की, 6 एलपीजू सिलेंडरची मर्यादा कोणी घातली होती? किंमत वाढविल्यानंतर एलपीजी सिलेंडरची मर्यादा ठरविण्याचा निर्णय जनविरोधी होता. देशातील जनता युपिए सरकारच्या या निर्णयाला कधीही विसरणार नाही आणि त्यांना कधीही माफ करणार नाही. जुलै 2012 पर्यंत सर्व कुटुंबाला कमी दरामध्ये आवश्यक संख्येत एलपीजी सिलेंडर मिळत होते. युपिए सरकारने ऑगस्ट 2012 मध्ये याला मागे घेतले.

जेव्हा एनडीए सरकार ने सत्ता सोडली तेव्हा त्यावेळी एलपीजी ची किंमत 224 रुपये प्रती सिलेंडर होती आज हा दर 415 रुपये प्रती सिलेंडर आणि लोकांना खुल्या बाजारात 1241 रुपये सिलेंडर खरेदी करावा लागत आहे. डीबीटी ज्याला घेऊन इतका प्रचार केला जात आहे की अजून अनेक कुटुंबियांपर्यंत ते पोचणे बाकी आहे.

(श्री अरुण कुमार जैन)